# प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग,

पत्ता : ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी पोलीस कॅम्प, वरळी, मुंबई–४०० ०३०.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५, कलम १९(१) अन्वये.

प्र.अ.अ. अपील क्रमांक २१/२०२३.

जा.क्र 78 /अपोउआ/लाप्रवि/बृमुंवि/मा.अ.अ. २१/२०२३ दिनांक :– १६/०३/२०२३

श्री. कमलाकर रत्नाकर शेणॉय ,
रा. बी –१ , वैशाली अपार्टमेंट, एमटीएनएल एक्सचेंज समोर ,
शेठ मोतीशा ( लव ) लेन ,
माझगांव , मुंबई १०

.....अपीलार्थी

विरुध्द

शासकिय माहिती अधिकारी
तथा सहा. पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग.

......प्रतिवादी

**प्रथम अपील अर्ज सुनावणी** दिनांक १६/०३/२०२३
अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित

| मुळ अर्जाचा दिनांक | जनमाहिती अधिका–याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| २१/०१/२०२३ | २१/०२/२०२३ | २३/०२/२०२३ |

अपीलार्थी श्री. कमलाकर रत्नाकर शेणॉय , यांनी दिनांक २१/०१/२०२३ रोजी शासकिय माहिती अधिकारी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज सादर करुन माहिती मागितली होती. त्यांच्या अर्जावर शासकिय माहिती अधिकारी यांनी जा.क्र. १०८/लाप्रवि/बृमुंवि/माअ/१६/२०२३ दि. २१/०२/२०२३ अन्वये उत्तर दिलेले आहे. सदर माहिती अधिकार पत्रान्वये पुरविलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपीलार्थी यांनी दि २३/०२/२०२३ रोजी केलेला अपील अर्ज या कार्यालयास दि. ०२/०३/२०२३ रोजी प्राप्त झालेला आहे. सदर अपीलाची सुनावणी दि १६/०३/२०२३ रोजी १२.३० वा. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कक्षात होणार असल्याबाबत कार्यालय जा.क्र. ६७/अपोउआ/लाप्रवि/मुंवि/माअप्रअ–२१/२०२३, दि. ०८/०३/२०२३ अन्वये अपीलार्थी यांना आगाऊ कळविण्यात आले होते. सदर अपील सुनावणीस अपीलार्थी उपस्थित होते. लाप्रवि मुंबई विभागाच्या वतीने प्रतिवादी श्री. संजय पाटील , सहाय्यक पोलीस आयुक्त तथा शासकीय माहिती अधिकारी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई हे समक्ष हजर होते.

Scanned with CamScanner

# आदेश

अपीलार्थी श्री. कमलाकर रत्नाकर शेणॉय , हे (अपील क्र. २१/२०२३) अपील सुनावणीस उपस्थित होते.

त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहितीचे उत्तर देण्यात आलेले आहे.

अपीलार्थी यांनी असे सांगितले की, माहिती अधिकार कलम ७ (१) अन्वये विचारलेली माहिती जनमाहिती अधिकारी कलम ८ व ९ व्यतिरिक्त नाकारु शकत नाही. जनमाहिती अधिकारी यांनी, अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती ही महाराष्ट्र शासनाच्या राजपत्राशी ( दि १६/०१/२०१२ रोजीच्या ) संबधित असल्याने त्या राजपत्राची नक्कल प्रत त्यांना देण्यात आलेली आहे. त्या राजपत्रातील काही मुद्दां बाबत उदा. १५० शब्द कसे मोजावेत ? ते राजपत्र माहिती अधिकाराच्या कोणत्या कलमान्वये प्रसिध्द करण्यात आले व त्या सदंर्भातील इतर माहिती अपिलार्थी यांनी विचारलेली असल्याने ती नाकारण्यात आलेली नसुन त्यांना रापजत्राची नक्कल प्रत यापुर्वीच पुरविण्यात आलेली असल्याने माहिती नाकारली आहे हे त्यांचे म्हणणे योग्य नाही.

अपिलार्थी यांनी असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी यांनी माहिती नाकारतांना कोणत्याही प्रकारे कारणीमिमांसा नमुद केलेली नाही. त्या मुळे जनमाहिती अधिकारी यांनी ती माहिती जाणुनबुजून अप्रामाणिकपणे अपिलार्थी यांच्यावर अन्याय करण्यासाठी नाकारलेली असल्याने ते IPC कलम १६६, १६७ अन्वये कारवाई करण्यास पात्र आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना विचारलेली माहिती नाकारलेली नसल्याने त्यांचे म्हणणे योग्य नसल्याचे सांगितले.

अपिलार्थी यांनी असे नमुद केले आहे की, त्यांनी विचारलेली माहिती नाकारतांना ती माहिती विधीमंडळास व संसदमंडळास देखील नाकारता येते हे त्यांच्या उत्तरात नमुद केलेले नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती नाकारण्यात आलेली नाही त्यामुळे त्यांचे म्हणणे योग्य नसल्याचे सांगितले.

अपिलार्थी यांनी असे नमुद केले आंहे की प्रथम अपिल अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांनी नाकारलेली माहिती अपिलार्थी यांना देण्याबाबत सुचित करावे, असे करण्यापुर्वी अपिल सुनावणी घेतल्यास ते बेकायदेशीर ठरते याबाबत असे नमुद करण्यात येते की, अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती जनमाहिती अधिकार यांनी नाकारलेली नसल्याने अपिलार्थी यांचा हा आक्षेप लागु होत नाही.

अपिलार्थी यांनी असे नमुद केले आहे की, जनमाहिती अधिकारी यांनी खोटी माहिती दिल्यास ते न्यायालयीन कारवाई होण्यास पात्र आहे. सदर बाबत असे नमुद करण्यात येते की, जनमाहिती अधिकारी यांनी माहिती नाकारलेली नसलयाने सदर मुद्दा गैरलागु आहे.

अपिलार्थी यांना देण्यात आलेली सांख्यिकी माहिती ही चुकीची असल्याचे अपिलार्थी यांनी सांगुन त्या बाबत स्पष्टीकरण केले. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी निरीक्षण करुन अपिलार्थी यांना पुरविण्यात आलेल्या साख्यिंकी माहिती मधील सन २०२० ची संख्या नजरचुकीने १६७२ अशी टंकलिखीत करण्यात आली असुन ती ६०१ अशी आहे व त्यामुळे एकुण संख्येमध्ये १०७१ एवढा फरक दिसत आहे. सदर ची चुक ही केवळ टंकलेखनाच्या त्रुटीमधुन झालेली आहे. सदर जनमाहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण अपिलार्थी यांनी मान्य केले.

अपिलार्थी यांनी असे नमुद केले की, गेल्या ६ वर्षापासुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयात ३५ गुप्त चौकशी, १९२ उघड चौकशी व ८३६३ इतर तक्रारी प्रलबिंत आहे. उर्वरीत प्रकरणांची निर्गती बाबत माहिती देण्यात

Scanned with CamScanner

आलेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी कार्यालयीन अभिलेखावर जी माहिती सांख्यिकी स्वरुपात उपलब्ध आहे ती अपिलार्थी यांना देण्यात आली असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

अपिलार्थी यांनी असे नमुद केले आहे की, त्यांनी लाप्रवि येथे दाखल एकुण गुन्हयाची मागितलेली माहिती ही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली असल्याचे कारण सांगुन नाकारता येणार नाही. त्यावर जनमाहीती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी त्यांना नक्की कोणत्या कालावधीतील माहिती अपेक्षित आहे हे स्पष्ट नमुद केलेले नसल्याचे त्यांना तसे कळविण्यात आले असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

अपिलार्थी यांनी असे नमुद केले की, लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे इतर विभागांना पाठविण्यात आलेल्या १६००० तक्रार अर्जाबाबत स्मरणपत्राच्या प्रती जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या नाहीत. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले अपिलार्थी यांच्या मुळ अर्जात हा मुद्दा विचारलेला नसल्याने ती माहिती देण्यात आलेली नाही.

अपिलार्थी यांनी असे नमुद केले की, दखलपात्र गुन्हयाच्या तक्रारी इतर विभागांना पाठविण्याबाबत भारतीय दंड प्रक्रिया संहितेमधील कलमांची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी दिलेली नाही. हे त्याच कायदयांच्या कलम १५४, १५६ (२) , १५७ व ललीता कुमारी न्यायनिर्णयांचा भंग आहे म्हणुन त्यावर जनमाहीती अधिकारी यानी असे स्पष्टीकरण दिले की, लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील संपुर्ण कामकाज हे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मॅन्युअल मध्ये नमुद तरतुदीनुसार चालते व सदर मॅन्युअलमधील सवेंदनशील भाग सार्वजनिकरित्या लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या वेबसाईडवर प्रदर्शित करण्यात आलेला आहे.

अपिलार्थी यांनी असे नमुद केले आहे की, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथुन इतर विभागास पाठविण्यात आलेल्या तक्रारी बाबतची कार्यवाही करण्याची कार्यपध्दती (SOP) त्यांना देण्यात आलेली नाही. तसेच अशा तक्रारीबाबत स्मरणपत्र पाठविण्यात येतात अशी चुकीची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी असे स्पष्टीकरण दिले की लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कार्यपध्दती ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मॅन्युअल प्रमाणे चालत असुन ते मॅन्युअल संवेदनशीलबाबी वगळुन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या वेबसाईटवर प्रदर्शित करण्यात आलेले आहे. तसेच जे अर्ज इतर कार्यालयास कलम १७ अ अन्वये सक्षम प्राधीकरणाची मंजुरी मिळविण्यासाठी पाठविले जातात त्याच अर्जासंदर्भात त्या त्या विभागांना ठराविक मुदतीनंतर स्मरणपत्र पाठविली जातात. त्यामुळे अपिलार्थी यांचे स्मरणपत्राबाबतचे म्हणणे योग्य नाही.

A / अपिलार्थी यांनी त्यांच्या अपिल अर्जात असे नमुद केले आहे की, प्रथम अपील अधिकारी यांनी अपील सुनावणी उघडया दालनामध्ये व पारदर्शीपणे घेण्यात यावी. अपीलार्थी हे ६५ वर्षाचे वरिष्ठ नागरीक असुन त्यांची सुनावणी निपक्षपातीपणे व पारदर्शीपणे होण्यासाठी सदर सुनावणीची व्हिडीओ रेकार्डीग करण्याची त्यांना मुभा देण्यात यावी. त्याप्रमाणे त्यांना सदर सुनावणीच्या वेळेस मुभा देण्यात आलेली आहे.

त्यामुळे वर नमुद सर्व अपीलार्थी यांच्या प्रत्येक मुदद्याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी सुस्पष्टपणे स्पष्टीकरण दिलेले असुन ते योग्य आहे. तसेच अपिलार्थी यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामधील कार्यपध्दती जनहिताच्या दृष्टिकोनातुन सुधारुन त्याचा लाभ सर्वसामान्य जनतेस घेता यावा या दृष्टिकोनातुन सदरची माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी उपस्थित केलेल्या प्रत्येक मुददबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मधील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेवुन त्यांचा कार्यपध्दतीत कायदेशीरबाबीचे पालन करुन सुधारणा घडवुन आणावी हे त्यांचे उदिष्ठ असल्याचे त्यांनी सांगितले. सबब सदरचा माहीती अधिकार अर्जाचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

Scanned with CamScanner

उपरोक्त अपीलाबाबत दिलेल्या निर्णयामुळे अपिलार्थी व्यथित झाल्यास, सदर निर्णयाची प्रत प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ९० दिवसांचे आत मा. राज्य माहिती आयुक्त, नवीन प्रशासकीय भवन, १३ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई – ४०० ०३२ यांचेकडे अपील दाखल करता येईल.

१६।३।२३

( हेमंत सावंत )
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर पोलीस उप आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई.

दूरध्वनी क्र. ०२२–२०८४०२५४
ई–मेल – acbmumbai@gmail.com

Scanned with CamScanner

प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग,
पत्ता : ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी पोलीस कॅम्प, वरळी, मुंबई–४०० ०३०.
माहितीचा अधिकार अधिनियम २००५, कलम १९(१) अन्वये.
प्र.अ.अ. अपील क्रमांक २०/२०२३.

जा.क्र ४१ /अपोउआ/लाप्रवि/बृमुंवि/मा.अ.अ. २०/२०२३ दिनांक :– २८/०३/२०२३

श्री. कमलाकर रत्नाकर शेणॉय ,
रा. बी –१ , वैशाली अपार्टमेंट,
एमटीएनएल एक्सचेंज समोर , शेठ मोतीशा ( लव ) लेन ,
माझगांव , मुंबई १० .....अपीलार्थी

विरुध्द

शासकिय माहिती अधिकारी ......प्रतिवादी
तथा सहा. पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग.

**प्रथम अपील अर्ज सुनावणी दिनांक १६/०३/२०२३**
अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित

| मुळ अर्जाचा दिनांक | जनमाहिती अधिका–याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| २४/०१/२०२३ | २०/०३/२०२३ | २८/०२/२०२३ |

अपीलार्थी श्री. कमलाकर रत्नाकर शेणॉय , यांनी दिनांक २४/०१/२०२३ रोजी शासकिय माहिती अधिकारी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज सादर करुन माहिती मागितली होती. त्यांच्या अर्जावर शासकिय माहिती अधिकारी यांनी जा.क्र. १८२/लाप्रवि/बृमुंवि/माअ/३०/२०२३ दि. २०/०३/२०२३ अन्वये उत्तर दिलेले आहे. सदर माहिती अधिकार पत्रान्वये पुरविलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपीलार्थी यांनी दि २८/०२/२०२३ रोजी केलेला अपील अर्ज या कार्यालयास दि. ०३/०३/२०२३ रोजी प्राप्त झालेला आहे. सदर अपीलाची सुनावणी दि १६/०३/२०२३ रोजी १२.३० वा. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कक्षात होणार असल्याबाबत कार्यालय जा.क्र. ६६/अपोउआ/लाप्रवि/मुंवि/माअप्रअ–२०/२०२३, दि. ०८/०३/२०२३ अन्वये अपीलार्थी यांना आगाऊ कळविण्यात आले होते. सदर अपील सुनावणीस अपीलार्थी उपस्थित होते. लाप्रवि मुंबई विभागाच्या वतीने प्रतिवादी श्री. संजय पाटील , सहाय्यक पोलीस आयुक्त तथा शासकीय माहिती अधिकारी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई हे समक्ष हजर होते.

Scanned with CamScanner

## आदेश

अपीलार्थी श्री. कमलाकर रत्नाकर शेणॉय , हे (अपील क. २०/२०२३) अपील सुनावणीस उपस्थित होते.

त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहितीचे उत्तर देण्यात आलेले आहे.

अपीलार्थी श्री. कमलाकर शेणॉय व जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीमध्ये मांडलेले मुद्दे, केलेला खुलासा यांचे अवलोकन केले असता ( अपील क. २०/२०२३ ) अपीलार्थी यांनी अपील करण्याचे कारण असे नमुद केले आहे की, त्यांना अपेक्षित माहिती ही मुदतीमध्ये त्यांना देण्यात आलेली नाही. माहिती अधिकार कायदयान्वये कलम ८ व ९ व्यतिरिक्त कोणतीही माहिती जनमाहिती अधिकाऱ्यांना नाकारता येणार नाही. तसेच माहिती नाकारण्याची कोणतीही कारणमिमांसा जनमाहिती अधिकारी यांनी केलेली नाही. अशाप्रकारे माहिती जाणुनबुजुन नाकारल्याने जनमाहिती अधिकारी यांनी भादवि १६६, १६७ अन्वये गुन्हा केलेला आहे. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी माहिती नाकारतांना ती माहिती विधानसभेस किंवा संसदेस नाकारु शकतो असे नमुद केलेले नाही. तसेच त्यांनी असेही नमुद केले आहे की, प्रथमअपिल अधिकारी किंवा राज्य माहिती आयोग यांनी अपील सुनावणी घेण्यापुर्वी अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती त्यांनी देण्याचे निर्देश दयावे. यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे उत्तर दिले की, अपिलार्थी यांनी केलेला माहिती अधिकार अर्ज हा मा. महासंचालक कार्यालय, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडे प्राप्त झाला होता. तो मुंबई विभागाशी संबधित असल्याने त्यांनी तो अर्ज दि २४/०२/२०२३ रोजी जनमाहिती अधिकारी, मुंबई विभाग यांचेकडे पाठविला. तसेच तो अर्ज मा. महासंचालक कार्यालयातील जनमाहिती अधिकाऱ्यास दि २४/०२/२०२३ रोजी प्राप्त झाल्याचे त्या पत्रावरुन दिसुन येत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती ही जाणुनबुजुन नाकारली असे म्हणणे योग्य नसुन ती माहिती संकलित करण्याचे काम सरु असुन ते ती माहिती अपिलार्थी यांना २ ते ४ दिवसात देण्यात येईल. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे अपिलार्थी यांनी मान्य केलेले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या अपिल अर्जात असे नमुद केले आहे की, प्रथम अपील अधिकारी यांनी अपील सुनावणी उघडया दालनामध्ये व पारदर्शीपणे घेण्यात यावी. अपीलार्थी हे ६५ वर्षाचे वरिष्ठ नागरीक असुन त्यांची सुनावणी निपक्षपातीपणे व पारदर्शीपणे होण्यासाठी सदर सुनावणीची व्हिडीओ रेकार्डीग करण्याची त्यांना मुभा देण्यात यावी. त्याप्रमाणे त्यांना सदर सुनावणीच्या वेळेस मुभा देण्यात आलेली आहे.

त्यामुळे वर नमुद अपीलार्थी यांच्या प्रत्येक मुद्दाबाबत जनमाहिती अधिकारी यांनी सुस्पष्टपणे स्पष्टीकरण दिलेले असुन ते योग्य आहे. अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती त्यांना वर नमुद मुदतीत देण्यात यावी असे जनमाहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आले. सबब सदरचा माहीती अधिकार अर्जाचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

उपरोक्त अपीलाबाबत दिलेल्या निर्णयामुळे अपिलार्थी व्यथित झाल्यास, सदर निर्णयाची प्रत प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ९० दिवसांचे आत मा. राज्य माहिती आयुक्त, नवीन प्रशासकीय भवन, १३ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई – ४०० ०३२ यांचेकडे अपील दाखल करता येईल.

२७/३/२३

( हेमंत सावंत )
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर पोलीस उप आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई.

दूरध्वनी क्र. ०२२-२०८४०२५४

Scanned with CamScanner